ePaper

# मुंबई विद्यापीठ सिनेटच्या निवडणुकीत युवासेनेची क्लीन स्वीप!



|| वर्ष - 8 । अंक -81 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- बांगलादेशी चाहत्याला मारहाण?
- अश्विनच्या नावे ऐतिहासिक कामगिरी
- आधी धर्म सांगा मग दर्शन घ्या
- आमदाराने विधानसभेत बलात्कार केला

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 28 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी

# 'एमएसपी' वाढवण्याचा प्रस्ताव!

### उपमुख्यमंत्री अजित पवार : जनसन्मान यात्रा चंदगड, कोल्हापुरात दाखल

। चंदगड ।महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेला कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रात महायुती पुन्हा सत्तेत येईल आणि सरकार स्थापन झाल्यानंतर अधिकाधिक कल्याणकारी योजना सुरू केल्या जातील, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.**






कोल्हापुरातील चंदगड येथे सुरू असलेल्या जनसन्मान यात्रेदरम्यान बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, येत्या दहा दिवसांत ४४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना शून्य वीजबिल मिळणार आहे. कोल्हापुरात वैद्यकीय महाविद्यालयासाठी एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी, आयुर्वेदिक महाविद्यालयाची स्थापना यासह विकासकामांची माहिती देताना ते म्हणाले की, हा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित केला जात आहे. कोल्हापुरातील शेतकरी वेळेवर कर्ज फेडण्यासाठी ओळखला जातो, असे सांगून ते म्हणाले की, १०० टक्के पीक कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन दिले जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी झालेल्या बैठकीत शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने फायदा व्हावा यासाठी हमीभाव वाढवण्याचा प्रस्ताव मांडला असून आठवडाभरात निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन यावेळी अजित पवार यांनी दिले.

माझी लाडकी बहिण योजनेबाबत बोलताना उपमुख्यमंत्री म्हणाले की, 1.59 कोटी महिलांना या योजनेचा लाभ झाला असून महायुतीची सत्ता आल्यास अशा कल्याणकारी योजना सुरूच राहतील. यात्रेत महिलांची मोठी उपस्थिती असताना अजित पवार यांनी पुरुषांपेक्षा महिला अधिक कार्यक्षम कार्यकर्त्या असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले.

आमदार राजेश पाटील यांनी या भागाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक करत आमदार राजेश पाटील यांनी गेल्या तीन वर्षांत या भागाच्या विकासासाठी १६०० कोटी रुपये मिळवून दिले आहेत, असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

> सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय स्थापन करण्यात राजेश पाटील यांचा मोलाचा वाटा होता. तुम्ही आम्हाला मतदान केल्यास पुढील टर्ममध्ये मतदारसंघाचा निधी दुप्पट करण्याची हमी मी देतो. राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीत मतदारांनी महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा द्यावा.
> **–अजित पवार,** उपमुख्यमंत्री.

## मेट्रोचं उद्घाटन न झाल्याने मविआ आक्रमक

### सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशनबाहेर आक्रमक आंदोलन

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।





पुण्यातील सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानकाबाहेर महाविकास आघाडीकडून आंदोलन करण्यात त आहे. शिवाजीनंगर ते स्वारगेट या मेट्रो मार्गाच्या उद्घाटनासाठी मविआच आंदोलन सुरू असून कार्यकर्ते अतिशय आक्रमक झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या मार्गाच उद्घाटन होणार होत, मात्र पावसामुळे त्यांचा पुणे दौरा रद्द झाला आणि हे उद्घाटनही लांबणीवर पडलं. मात्र यामुळे पुण्यातील प्रवाशांचे मोठे हाल होत असल्याचा आरोप केला जात आहे.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आता येत्या रविवारी या मेट्रो मार्गाचं ऑनलाइन उद्घाटन करणार आहेत. मात्र त्या आधीच महाविकास आघाडीचे नेते आक्रमक झाले आहेत. सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशनबाहेर त्यांच्याकडून जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन सुरू आहे. नरेंद्र मोदी हाय हाय अशा घोषणाही देण्यात आल्या आहेत.

आजच्या आज मेट्रो स्टेशनचं उद्घाटन करावं अशी मागणी मविआकडून करण्यात येत आहे.

### मेट्रो कोणाच्या बापाच्या मालकीची नाही

पुण्याच्या जनतेला वेठीस धरू नका. तुमच्याकडे केंद्रीय मंत्री आहेत, त्यांच्या हस्ते उद्घाट का नाही केलं ? आम्ही एवढा टॅक्स भरतो, तरी या गोष्टींसाठी आम्हाला त्रास का देता. ही मेट्रो आमच्या पैशांतून सुरू झाली आहे, कोणाच्या बापाची नाहीये असे म्हणत संतप्त कार्यकर्त्यांनी भूमिका मांडली. लोकांसाठी ही मेट्रो आहे, त्यामुळे ऑनलाइन पद्धतीने ताबडतोब ही मेट्रो सुरू केली पाहिजे. त्यासाठी हे आंदोलन सुरू आहे, अशी प्रतिक्रिया एका महिलेने दिली.

# टिंगरे तू कुणाच्या पक्षातून निवडून आलास?

## निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू : शरद पवार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. ड्रंक अँन्ड रन प्रकरणी अल्पवयीन मुलाला अटकही करण्यात आली. परंतु, या प्रकरणात अल्पवयीन चालकाला वाचवण्याचा प्रयत्न वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे यांनी केल्याचा आरोप शरद पवार यांनी केला आहे.**



सुनील टिंगरे यांचे विरोधक बापूसाहेब पठारे यांनी शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेशावेळी शरद पवार पुण्यातील खराडी येथे बोलत होते.शरद पवार म्हणाले, “सुनील टिंगरे तू कुणाच्या पक्षातून निवडून आलास? हा पक्ष कोणी काढला सगळ्या हिंदुस्थानला माहितीये. त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली. तू सोडून गेला ते ठिकाय. निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू, दोन तरुण मुलांना त्यांनी उडवलं काय, जागच्या जागी त्यांची हत्या काय होते, अशा वेळेला जे जखमी झाले त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवट्या आमदार पोलीस ठाण्यात जातो आणि चालकाला वाचवतो. यासाठी मते मागितली होती? मतं राष्ट्रवादीच्या नावाने मागितली. शरद पवारांच्या नावाने मतं मागितली. आणि लोकांनी श्रद्धेने मतदान केलं. त्याचं उत्तरदायित्व या पद्धतीने केलं.”शरद पवार सुरुवातीलाच म्हणाले, “पाऊस आला म्हणून पंतप्रधांनांनी पुण्यातील सभा रद्द केली. पण आम्ही ठरवलंकी पाऊल आला तरी सभा घ्यायचीच. पुण्याचं वैशिष्ट्य काय तर कोयगा गँग. पुण्याची ओळख बजाजचा कारखाना हे पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, किर्लोस्करांचा कारखाना पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, पुणे विद्येचे माहेरघर होतं. आणि आता कोयता गँग हे पुण्याचं वैशिष्ट्य झालंय.”शरद पवार पुढे म्हणाले, मागील वेळी लोकसभेला आम्हाला फक्त चार आणि काँग्रेसला एक जागा मिळाली होती. पण मी निर्धार केला की विधानसभेला आपण हे चित्र बदलायचे आणि लोक उभे राहिले. आता तर लोकसभेला आपण ३१ जागा जिंकल्यात. मोदी म्हणतात की कुटुंबासाठी विरोधक राजकारण करतात. पण या लोकांचं योगदान नाही का? जवाहरलाल नेहरू १४ वर्षे तुरुंगात होते. इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले. त्यांची हत्या झाली. राजीव गांधींनी नवीन तंत्रज्ञान आणले. त्यांची हत्या झाली. ही साधीसुधी माणसे नव्हती आणि नरेंद्र मोदी विचारतात की यांनी काय केले?” आगामी विधानसभा निवडणुकीत वडगावशेरी मतदारसंघातून शरद पवार गटातून बापू पाठारे यांना उमेदवारी निश्चित मानली जात आहे. अजित पवार गटाचे सुनील टिंगरे हे या मतदारसंघाचे आमदार आहेत.

सध्या या मतदारसंघात महायुतीकडून मोठ्या प्रमाणावर इच्छुक आहेत. त्यामुळे आता महायुतीकडून अजित पवार गटाला की भाजपाला हा मतदारसंघ सोडला जातो? हे पाहावे लागणार आहे. सगळ्या हिंदुस्थानला माहितीये. त्या पक्षाच्या वतीने तुला संधी दिली. तू सोडून गेला ते ठिकाय. निवडणुकीत तुझा कसा बंदोबस्त करायचा ते करू, दोन तरुण मुलांना त्यांनी उडवलं काय, जागच्या जागी त्यांची हत्या काय होते, अशा वेळेला जे जखमी झाले त्यांना मदत करण्याऐवजी हा दिवट्या आमदार पोलीस ठाण्यात जातो आणि चालकाला वाचवतो. यासाठी मते मागितली होती? मतं राष्ट्रवादीच्या नावाने मागितली. शरद पवारांच्या नावाने मतं मागितली. पण आम्ही ठरवलंकी पाऊल आला तरी सभा घ्यायचीच. पुण्याची ओळख बजाजचा कारखाना हे पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, किर्लोस्करांचा कारखाना पुण्याचं वैशिष्ट्यं होतं, पुणे विद्येचे माहेरघर होतं.

### पाकिस्तानचे दोन तुकडे केले

आणि आता कोयता गँग हे पुण्याचं वैशिष्ट्य झालंय.”शरद पवार पुढे म्हणाले, मागील वेळी लोकसभेला आम्हाला फक्त चार आणि काँग्रेसला एक जागा मिळाली होती. पण मी निर्धार केला की विधानसभेला आपण हे चित्र बदलायचे आणि लोक उभे राहिले. आता तर लोकसभेला आपण ३१ जागा जिंकल्यात. मोदी म्हणतात की कुटुंबासाठी विरोधक राजकारण करतात. पण या लोकांचं योगदान नाही का? जवाहरलाल नेहरू १४ वर्षे तुरुंगात होते. इंदिरा गांधींनी पाकिस्तानचे दोन तुकडे केले. पुण्यातील कल्याणीनगर परिसरात १९ मे रोजी भीषण अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. ड्रंक अँन्ड रन प्रकरणी अल्पवयीन मुलाला अटकही करण्यात आली

# प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एमआयडीसीला दणका!

## कुरकुंभ परिसरातील जलस्रोत प्रदूषित केल्याप्रकरणी कारवाईचे पाऊल

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. या प्रकल्पातील सांडपाण्यामुळे परिसरातील जलस्रोत प्रदूषित होत असल्याची बाबही समोर आली आहे.**

या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला नोटीस बजावली आहे.कुरकुंभ एमआय़डीसीतील जलप्रदूषणाचा प्रश्न वारंवार उपस्थित होत आहे. एमआयडीसीतील सांडपाणी नाल्यांमध्ये जाऊन त्यामुळे जलस्रोत प्रदूषित होत असल्याची तक्रार येथील नागरिक वारंवार करीत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने ही नोटीस बजावली आहे. मंडळाचे प्रादेशिक अधिकारी जगन्नाथ साळुंखे यांनी २५ सप्टेंबरला कुरकुंभ एमआयडीसीला नोटीस बजावली आहे. त्यात एमआयडीसीतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.नोटिशीमध्ये म्हटले आहे की, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या ठिकाणी जमिनीत मुरणारे सांडपाणी रोखण्यासाठी एमआयडीसीने पुढील सात दिवसांत कृती आराखडा सादर करावा. याचबरोबर इतर संस्थांच्या मदतीने जल परीक्षण दर तीन महिन्यांनी करावे. एमआयडीसीने जुन्या जलवाहिन्या आणि सांडपाणी वाहिन्या या वर्षाच्या अखेरपर्यंत बदलाव्यात. एमआयडीसीतील जलवाहिन्यांमध्ये गळती झाल्यास तिथून सांडपाणी पिण्याच्या पाण्यामध्ये मिसळू शकण्याचा धोका आहे. त्यामुळे हे निर्देश देण्यात आले आहेत. उद्योगांमधून बाहेर पडणारे सांडपाणी रोखण्यासाठी एमआयडीसीने पावले उचलावीत. यात एमआयडीसीने समन्वय संस्था म्हणून काम करावे.

### कारवाई करण्याचे पाऊल उचलावे

कुरकुंभ एमआयडीसीतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत दिलेल्या निर्देशांचे पालन केल्याचा मासिक अहवाल एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना देण्यास सांगण्यात आले आहे. अन्यथा एमआयडीसीवर कायदेशीर कारवाई करण्याचे पाऊल उचलावे लागेल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची नोटीस मिळाली आहे. याआधीही मंडळाने नोटीस दिली होती. त्यानुसार कार्यवाही केली जात आहे. जुनी जलवाहिनी आणि सांडपाणी वाहिनी बदलण्याचे काम सुरू आहे. याचबरोबर सांडपाणी तपासणीही दरमहा केली जात आहे.कुरकुंभ औद्योगिक वसाहतीतील सामाईक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील अनेक गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत.

# पिंपरी-चिंचवडकरांच्या सेवा सुलभ होणार

# ‘पीसीएमसी’ प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतीप्रथावर!

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून आतापर्यंत या इमारत बांधकामाचे महत्वाचे टप्पे गाठले आहेत. जानेवारी २०२३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा हेतू सर्व महापालिका कार्यालयांना एकाच छताखाली केंद्रित करणे, नागरिकांना अधिकाधिक सेवा अधिक सुलभ पद्धतीने पुरविणे आणि एकूण कार्यक्षमतेत सुधारणा करणे हा आहे.**



इमारत उभारण्यासाठीचे खोदकाम, पाया आणि तळघराच्या पातळीचे काम पूर्ण झाले असून आता सध्या तळमजला बांधण्याचे काम सुरू आहे. इमारतीचे काम पुर्ण झाल्यावर नवीन सुविधांमध्ये नागरिक सेवा केंद्र, बहुउद्देशीय हॉल आणि ई-गव्हर्नन्स केंद्र यांसारख्या सार्वजनिक सुविधांचा समावेश असणार आहे, ज्यामुळे नागरिकांना महापालिकेच्या अधिकाधिक सेवा एकाच छताखाली उपलब्ध होण्यास मदत मिळणार आहे. तसेच यामध्ये मेळावे, प्रदर्शने आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठीही भव्य जागा उपलब्ध असणार आहे.

८.६५ एकरच्या विस्तृत भूखंडावर वसलेली ही इमारत नागरिकांना विविध आधुनिक सेवा तर प्रदान करेलच पण शाश्वत विकासासाठी महापालिकेच्या वचनबद्धतेचे प्रतीक म्हणूनही उभी राहील. तसेच ग्रीन बिल्डींगनुसार या इमारतीचे बांधकाम करण्यात येणार असून इमारतीस गृह (ग्रीन रेटिंग फॉर इंटग्रेटेड हॅबिटेट असेसमेंट) परिषदेचे ५ स्टार मानांकन आणि इंडियन ग्रीन बिल्डींग काउंसिलचे (आयजीबीसी) प्लॅटिनम मानांकन मिळविण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे. यासोबतच सोलर पॅनेल, पाण्याचा पुनर्वापर करणारी यंत्रणा आणि ग्रीन स्पेसेस यांसारख्या वैशिष्ट्यांसह परिपुर्ण असलेल्या या इमारतीची संरचना नागरिक तसेच कर्मचाऱ्यांसाठी पर्यावरणपूरक आणि प्रसन्न वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने तयार करण्यात येणार आहे. प्रकल्पाचे ठेकेदार के.एम.व्ही प्रोजेक्ट्स लि. हैदराबाद हे असून सुनिल पाटील असोसिएट्स प्रा.लि हे वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार

## पुढील टप्प्यात इमारतीचे मजले बांधण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार

खोदकाम, पाया उभारणी आणि तळघराचे काम पुर्ण झाल्यानंतर पुढील टप्पात इमारतीचे मजले बांधण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. नवीन इमारत भविष्यात पिंपरी चिंचवडमधील एक महत्वाचे स्थळ म्हणून उदयास येईल आणि नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा देण्यासाठी कार्यक्षम प्रशासन म्हणून काम करेल.

## बांधकामाच्या दुसऱ्या टप्प्यात मजले बांधण्यावर लक्ष केंद्रित करणार!

“महापालिकेची नवीन प्रशासकीय इमारत केवळ कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेतच वाढ करणार नाही तर महत्त्वाच्या सेवांमध्ये नागरिकांचा प्रवेश देखील निश्चित करेल. याद्वारे नागरिकांसाठी सर्वसमावेशक वातावरण तयार करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असून एकाच छताखाली उपलब्ध असलेल्या विविध सेवांच्या विस्तृत सोयीसह जनतेसाठी अखंड सेवा प्रदान करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.



**–शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## नवीन प्रशासकीय इमारतीची वैशिष्ट्ये:

प्रकल्प खर्च:- ३१२ कोटी रूपये (मान्य झालेली निविदा रक्कम - २८६ कोटी रुपये)

ग्रीन बिल्डींग सर्टिफिकेट - गृह (ग्रीन रेटिंग फॉर इंटग्रेटेड हॅबिटेट असेसमेंट) परिषदेचे ५ स्टार मानांकन आणि इंडियन ग्रीन बिल्डींग काऊंसिलचे (आयजीबीसी) प्लॅटिनम

## मानांकन मिळविण्यावर भर

**प्रकल्प क्षेत्र :-** ९१,४५९ चौरस मीटर बांधकाम क्षेत्रासह ८.६५ एकर भूखंड

**पर्यावरणपूरक सुविधा:-** सौर ऊर्जेचा वापर, पाण्याचा पुनर्वापर आणि ग्रीन स्पेसेस

**इमारतीची रचना:-** प्रत्येकी ३ तळघरांसह ६ ते १८ मजल्यापर्यंतचे ३ विभाग

**आधुनिक सुविधा:-** नागरिक सेवा केंद्र, बहुउद्देशीय सभागृह, ई-गव्हर्नन्स केंद्र, ग्रंथालय, दवाखाना आणि बरेच काही प्रकल्पाची

**मुदत:-** जानेवारी २०२३ पासून ३६ महिने (खोदकाम आणि तळघराचे काम पुर्ण झाले आहे)

# ‘इंद्रायणी थडी महोत्सव’च्या बूकिंगसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद !

## अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु : भाजपा आमदार महेश लांडगे यांचा उपक्रम

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज


**महाराष्ट्रातील ‘रेकॉर्ड ब्रेक’ इंद्रायणी थडी महोत्सवाला यावर्षीसुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या महोत्सवामध्ये स्टॉल लावण्यासाठी महिला बचतगटांनी अवघ्या आठ दिवसांत ३ हजारांहून अधिक अर्ज घेतले आहेत.**




“महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता विकास” या उद्देशाने भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या अध्यक्ष पुजा लांडगे यांच्या पुढाकाराने भोसरी येथील गावजत्रा मैदानावर प्रतिवर्षी “इंद्रायणी थडी महोत्सव” आयोजित केला जातो.

भोसरी आणि परिसरातील महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळावे. महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी उद्योजकतेला प्रोत्साहन द्यावे. या करिता आयोजित केला जाणारा महोत्सव महाराष्ट्रातील सर्वाधिक उलाढाल आणि अफाट गर्दीचा म्हणून ओळखला जातो. इंद्रायणी थडी महोत्सवासाठी भोसरी विधानसभा मतदार संघातील महिला बचत गटांना यावर्षी प्राधान्य देण्यात येणार आहे.

“महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता प्रोत्साहन देण्याकरिता प्रतिवर्षी ‘इंद्रायणी थडी’ चे आयोजन केले जाते. यावर्षीसुद्धा भव्य-दिव्य नियोजन करण्यात येणार आहे. महिला बचत गटांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे अल्पावधीत हा महोत्सव लोकप्रिय झाला आहे. चार-पाच दिवसांत महोत्सवाला लाखो नागरिक भेट देतात. कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. त्यामुळे महिला बचत गट आणि विविध लघु उद्योजकांना प्रोत्साहन मिळते. पावसाचा अंदाज, शाळांच्या परीक्षा आदी बाबींचा अंदाज घेवून, महोत्सवाचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.



**–महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा,




**राजकारणी आणि भूखंड वाटप हे एक नाजूक प्रकरण. काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना, केंद्रीय मंत्र्यांना वा राज्यांच्या मंत्र्यांना भूखंड वाटपातील कथित गैरव्यवहारांवरून राजीनामे द्यावे लागले आहेत. तरीही त्यातून काहीही बोध घेण्यास राजकारणी तयार नाहीत.**

# भूखंड घोटाळ्याची तऱ्हा

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्या पत्नीला करण्यात आलेल्या भूखंड वाटपात झालेल्या कथित घोटाळ्याची चौकशी करण्याचा राज्यपालांचा आदेश अवैध ठरवावा यासाठी सिद्धरामय्या यांनी केलेली याचिका कर्नाटक उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यानंतर लगेचच भाजपने सिद्धरामय्या यांच्या राजीनाम्याची मागणी सुरू केली. योगायोगाने त्याच वेळी महाराष्ट्रात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे अध्यक्ष असलेल्या संस्थेला नागपूरजवळील कामठीमध्ये भूखंड देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. नियमांचे पालन करून भूखंड वाटप झाले असते तर आक्षेप घेण्यास काहीच जागा नव्हती. पण महसूल व वित्त या दोन विभागांनी घेतलेला आक्षेप डावलून पाच हेक्टर जागा कवडीमोल दराने बावनकुळे यांच्या संस्थेला मिळाली आहे. ही संस्था महाविद्यालय सुरू करणार आहे. परंतु ही संस्था उच्च व तंत्र शिक्षण विभागात काम करीत नसल्याने संस्थेस थेट आणि सवलतीच्या दरात भूखंड देण्यास



महसूल व वित्त खात्याचा आक्षेप होता. भाजपच्या प्रदेशाध्यक्षांचा प्रस्ताव असल्याने सारे नियम बाजूला सारून भूखंड मिळाला. या जागेवर उभारण्यात येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये गोरगरीब मुलांना शिक्षणाच्या संधी मिळतील याची खबरदारी बावनकुळे यांना घ्यावी लागेल. अन्यथा व्यवस्थापन कोट्याच्या नावाखाली देणग्या वसुलीचे नवीन दुकान सुरू व्हायचे. असो, निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने भाजपच्या प्रदेशाध्यक्षांना खूश केले आहे !महाराष्ट्राप्रमाणेच शेजारील कर्नाटकमधील राजकारण्यांना भूखंड वाटपात फारच रस. काँग्रेसमध्ये असले तरी मूळच्या समाजवादी विचारसरणीच्या सिद्धरामय्या यांनाही जमिनीचा बहुधा मोह आवरलेला दिसत नाही. म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ॲथोरिटी (मुडा) या शासकीय प्राधिकरणाने भूसंपादन करताना मूळ मालकांना मोक्याची किंवा अधिक किमतीची जागा वाटल्याचा आरोप आहे. यातून 'मुडा'चे हजारो कोटींचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. सिद्धरामय्या यांच्या पत्नी पार्वती यांना मूळ जागेच्या बदल्यात मोक्याच्या ठिकाणी १४ भूखंडाचे वाटप करण्यात आले होते. हे भूखंड सिद्धरामय्या यांच्या पत्नीला मिळाले ते २०२१ मध्ये आणि तेव्हा कर्नाटकमध्ये भाजपचे सरकार होते. यामुळे या भूखंड वाटपात आपण सत्तेचा गैरवापर केलेला नाही हा सिद्धरामय्या यांचा दावा आहे. त्यांच्या पत्नी पार्वती यांना ४८०० चौरस फुटांची पर्यायी जागा देणे अपेक्षित असताना त्यांना ५५ कोटी किंमतीची ३८ हजार चौरस फुटाची जागा वाटप करण्यात आल्याचा मूळ आक्षेप होता. तीन खासगी तक्रारदारांच्या तक्रारीवरून राज्यपाल थवरचंद गेहेलोत यांनी सिद्धरामय्या यांच्या विरोधात चौकशी करण्याचा आदेश दिला होता. उच्च न्यायालयाने चौकशी सुरू ठेवण्याचा आदेश दिल्याने कदाचित भाजपच्या मागणीनुसार सीबीआय चौकशी केली जाऊ शकते. सिद्धरामय्या यांनी आपण काहीच चुकीचे केलेले नाही, असा दावा करीत राजीनाम्याची शक्यता फेटाळली आहे. भूखंड वाटपाच्या घोटाळ्यातच राज्यात मनोहर जोशी व अशोक चव्हाण तर कर्नाटकात येडियुरप्पा यांना राजीनामा द्यावा लागल्याची उदाहरणे आहेत. सिद्धरामय्या यांनी चुकीचे काही केले असल्यास त्यांना शिक्षा भोगावीच लागेल. पण सिद्धरामय्या यांच्या विरोधात चौकशीसाठी राज्यपाल गेहेलोत यांनी दिलेल्या परवानगीवरून घेण्यात येणाऱ्या आक्षेपाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. सध्या बिगर भाजपशासित राज्यांमध्ये राज्यपाल विरुद्ध लोकनियुक्त सरकारांमध्ये संघर्ष सुरू आहे. सिद्धरामय्या यांच्या विरोधात ज्या प्रकारे चौकशीस राज्यपालांनी मान्यता दिली त्यावरून संशयाला वाव निर्माण होतो. खाण वाटपात विद्यमान केंद्रीय मंत्री तथा तत्कालीन मुख्यमंत्री, धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते कुमारस्वामी यांच्या विरोधात खटला दाखल करण्यास परवानगी द्यावी म्हणून कर्नाटक लोकायुक्तांनी राज्यपालांकडे गेल्या वर्षी प्रकरण सादर केले आहे.

## प्रासंगिक »

### विस्कळीत वास्तव!

***भारत आणि चीन यांच्यातील सीमावादाबाबत आणि त्यातही पूर्व लडाखमधून जाणाऱ्या सीमेसंदर्भात उभय देशांत 'लक्षणीय प्रगती' झाली ही तशी चांगलीच घटना.***

तिचे स्वागत. काही दिवसांपूर्वी आपले परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी उभय देशांतील संबंधांत '७५ टक्के' सुधारणा झाल्याचे विधान केले होते. या ७५ टक्क्यांत मार्गी लागलेल्या वा मिटलेल्या समस्या कोणत्या आणि त्याहीपेक्षा उर्वरित २५ टक्क्यांत कशा-कशाचा समावेश आहे याबाबत स्पष्टता नसली तरी आपले परराष्ट्रमंत्रीच ७५ टक्क्यांचा वायदा देत असतील तर त्याबाबतही समाधान बाळगायला हवे. कारण उभय देशांतील तणावात गेल्या चार वर्षांत चांगलीच वाढ झालेली आहे आणि त्यास प्राय: चीन जबाबदार आहे. करोनाकाळात जग स्तब्ध असताना चीनने आगळीक केली आणि हे संबंध पुन्हा बिघडले. सध्या पूर्व लडाख परिसरात 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषा' (लाइन ऑफ ॲक्चुअल कंट्रोल) परिसरात उभय देशांतील तणाव कमी व्हावा यासाठी चर्चा सुरू आहे. या चर्चेत चांगली प्रगती होत असल्याचे वृत्त आहे.

आषाढातही कोसळणे, श्रावणातही कोसळणे, भाद्रपदातही कोसळणे आणि मग कधीही, कोणत्याही काळी, जरा वाऱ्यांनी हवेत आर्द्रता भरण्याचा अवकाश, की पुन्हा फक्त कोसळणेच! पाऊसही आताशा एकसुरी किंबहुना 'एकसरी' झालेला आहे. झिमझिमणे, रिमझिमणे, रुणझुणणे बंद होऊन केवळ कोसळणे उरले की असे होते.

## पावसाच्या लहरीपणाने काय काय 'कोसळ'णार?

'कमी वेळात खूप जास्त पाऊस' हे समीकरण गेल्या सुमारे दशकभरापासून रुळू लागले आहे. खरे तर असे होणार, याचे भाकीत भारतीय हवामानशास्त्र संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी पावसाच्या अनेक अभ्यासांतून, शोधनिबंधांतून १५ वर्षांपूर्वीच वर्तवून ठेवले होते. पण यंत्रणेला तसेही शास्त्रीय दृष्टिकोनाचे वावडे असल्याने या अभ्यासांतील इशाऱ्यांनी जागे होऊन, त्याप्रमाणे व्यवस्थांमध्ये सुधारणा कराव्यात, असे कधीही सुचले नाही.यंदाच्या पावसाळ्यात पुण्या-मुंबईसह राज्यभरात अनेक ठिकाणी अत्यंत कमी कालावधीत १०० मिलिमीटरहून अधिक पावसाच्या नोंदी सातत्याने होत आहेत. सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील पाथरपुंज गावातील पावसाने तर यंदा चेरापुंजीशी स्पर्धा केली. आधी कोरड्या राहिलेल्या मराठवाड्याचीही पावसाने नंतर पुरती दाणादाण उडवली. विदर्भातही तेच. पुण्यात परवा सप्टेंबरच्या सरासरीच्या



७२ टक्के पाऊस अवघ्या दोन तासांत कोसळला. मुंबईत त्याच दिवशी अनेक ठिकाणी काही तासांच्या पावसाने २०० मिलिमीटरचा टप्पा ओलांडला. हिंदमाता, साकीनाका, टिळकनगर, घाटकोपर, भेंडी बाजार, गोरेगाव, कांदिवली आदी अनेक ठिकाणी पाणी तुंबून वाहतुकीचा, लोकलचा खोळंबा झाला. सप्टेंबरमधील या पावसाने शेतीचेही बरेच नुकसान केले. काढणीला आलेल्या उभ्या पिकांना बसलेला फटका शेतकऱ्यांसाठी वेदनादायी आहे. सोयाबीन, कांदा, भुईमूग, बाजरी, उडीद, कापूस या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यभरातील सुमारे ३२ हजार ९९७ हेक्टर एवढे क्षेत्र गेल्या तीन दिवसांतील पावसाने बाधित झाल्याचा अंदाज आहे. त्यातही सर्वाधिक फटका मराठवाड्याला आणि तेथील सोयाबीनला बसला आहे. याची झळ शेतकऱ्याला, व्यापाऱ्याला आणि अंतिमत: ग्राहकालाही बसणार आहेचतो हा, की पाऊस आता लहरीपणानेच वागणार आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेलाही फटका बसणार, हे माहीत असूनही त्यानुरूप बदल करण्याची पावले उचलली कधी जाणार आहेत? पावसाचा अंदाज हा त्यातील अग्रक्रमाचा मुद्दा. उपग्रह, रडार या उपकरणांची आधुनिक रूपे नक्की काय माहिती पुरवतात आणि त्याद्वारे अचूक अंदाज सर्वदूर पोहोचतो का, हा प्रश्न सर्वसामान्यांना कायमच पडतो. असतानाही नदीकाठच्या रहिवाशांना धरणांतून पाणी सोडल्याचे कळते केव्हा, तर घरात पाणी शिरल्यावर. या अवस्थेमुळे किंबहुना अनास्थेमुळे विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होतो आहे, हे या सगळ्या यंत्रणा समजून घेणार आहेत की नाहीत?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मोदी व शहा यांचे आम्ही आभार मानतो!

## त्यांनी आमच्या पक्षातील सर्व दोष त्यांच्याकडे घेतलेः जयंत पाटील

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या वतीने व सर्व राज्यातील कार्यकर्त्यांच्या वतीने मी आभार मानतो की त्यांनी आमच्या पक्षातील सर्व दोष काढून घेतले आणि ते स्वतःकडे घेतले आहे. आणि यामुळेच लोकसभेच्या निवडणुकीमध्ये आम्हाला चांगली यश मिळाले असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी श्रीगोंदे येथे बोलताना केले.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या पक्षाच्या वतीने राज्यामध्ये जनस्वराज्य यात्रा काढण्यात आली आहे. ही यात्रा श्रीगोंदा येथे आल्यावर माजी आमदार राहुल जगताप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. या यात्रेमध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके ,युवकचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, विद्यार्थी संघटनेचे सुनील गव्हाणे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, राहुल जगताप, बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे, दीपक भोसले, हरिदास शिर्के, केशवराव मगर ,जिजाबापू शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर आणि प्रचंड मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की, सर्व नेते एकत्र असताना माघील लोकसभा निवडणुकीत राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची चार खासदार राज्यात निवडून आले होते मात्र सर्वजण सोडून गेले आणि आमचे आठ खासदार निवडून आले आहे. आणि याचे श्रेय आम्ही मोदी आणि शहा यांना देतो. लोकसभेच्या निवडणुकीच्या पूर्वी भाजप नेते देशात व राज्यात काय तोऱ्यामध्ये वागत होते हे सर्वांनी पाहिले. मात्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्यांच्या बूथ कमिट्या कोठे वाहून गेल्या हे देखील समजले नाही. याचे कारण ईडी सारख्या संस्था सांभाळणाऱ्यांना माणसे सांभाळता आले नाही. आणि शरद पवार यांनी मात्र आजपर्यंत माणसे जपली त्यामुळे हे यश मिळाले. यावेळी त्यांनी राज्यामध्ये सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांवर कोरडे ओढले तसेच सध्या रिझर्व बँकेकडून आठ लाख कोटी रुपयांचे यापूर्वीच कर्ज घेतलेले असताना पुन्हा आणखी नवीन कर्जाची मागणी या सरकारने केली आहे याचा अर्थ आम्ही सत्तेवरून तो जाणार आहोत परंतु जाताना राज्याची वाट लावून जाणार अशी भूमिका घेतली आहे अशी टीका श्री पाटील यांनी केली.यावेळी बोलताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, देशातील जनतेला भाजपने ईडी काय असते हे दाखवले. आणि या संस्थेमुळेच साहेबांचे बोट धरून राजकारणात आलेल्यांनी त्यांची बोट सोडले. आणि त्यांची अवस्था किती वाईट भाजपने केली आहे हे आता सर्व जनता पाहत आहे अशी टीका अजित पवार यांचे नाव न घेता अमोल कोल्हे यांनी केली. यावेळी बोलताना माजी आमदार राहुल जगताप पाटील म्हणाले की, कारखान्यासाठी एनसीडीसी चे कर्ज मिळत असताना देखील केवळ मी साहेबांच्या सोबत आहे म्हणून जाणीवपूर्वक डावलले गेले आहे. परंतु तुम्ही कितीही माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न करा, मी श्रीगोंदा तालुक्यातील जनतेच्या पाठिंब्यावर साहेबांच्या सोबत कायम राहणार आणि साहेबांची साथ कधीही सोडणार नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कारखान्याचे राहिलेले पैसे ५ ऑक्टोबर पर्यंत सर्व देणे देण्यात येतील असे देखील राहुल जगताप पाटील यावेळी म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार यांच्या पक्षाच्या वतीने राज्यामध्ये जनस्वराज्य यात्रा काढण्यात आली आहे. ही यात्रा श्रीगोंदा येथे आल्यावर माजी आमदार राहुल जगताप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. या यात्रेमध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार अमोल कोल्हे, खासदार निलेश लंके ,युवकचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, विद्यार्थी संघटनेचे सुनील गव्हाणे, राजेंद्र फाळके, राहुल जगताप, बाजार समितीचे सभापती अतुल लोखंडे, दीपक भोसले, हरिदास शिर्के, केशवराव मगर ,जिजाबापू शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर आणि प्रचंड मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की, सर्व नेते एकत्र असताना माघील लोकसभा निवडणुकीत राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची चार खासदार राज्यात निवडून आले होते.

### आमचे आठ खासदार निवडून आले

मात्र सर्वजण सोडून गेले आणि आमचे आठ खासदार निवडून आले आहे. आणि याचे श्रेय आम्ही मोदी आणि शहा यांना देतो. लोकसभेच्या निवडणुकीच्या पूर्वी भाजप नेते देशात व राज्यात काय तोऱ्यामध्ये वागत होते हे सर्वांनी पाहिले. मात्र लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर त्यांच्या बूथ कमिट्या कोठे वाहून गेल्या हे देखील समजले नाही. याचे कारण ईडी सारख्या संस्था सांभाळणाऱ्यांना माणसे सांभाळता आले नाही.निवडणुकीमध्ये आम्हाला चांगली यश मिळाले असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी श्रीगोंदे येथे बोलताना केले.

# सरकार सांगेल तेच अदाणींना करावं लागेल

## देवेंद्र फडणवीसांचं धारावी पुनर्विकासाबाबत मोठं वक्तव्य

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकारने धारावी झोपडपट्टी पुनर्वसन व विकास प्रकल्पाचं काम अदाणी समुहाला दिलं आहे. यावरून विरोधक राज्य सरकारवर टीका करत आहेत. पुनर्वसन व विकास नियमांमध्ये बदल करण्याच्या मुद्द्यावरून सध्या वाद चालू आहे.**



मुंबईत कोणताही बांधकाम व्यावसायिक किंवा विकासक एखादं घर बांधत असेल, इमारत उभी करत असेल तर त्याला ४०% टीडीआर अदाणी किंवा धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरणाकडून (DHARAVI REDEVELOPMENT PROJECT AUTHORITY) खरेदी करावा लागेल. असं झाल्यास मुंबईतील घरांच्या किमती गगनाला भिडतील किंवा मुंबईतील घरांच्या किमती गौतम अदाणींची कंपनी नियंत्रित करू शकेल, असा आरोप केला जात आहे. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं आहे. फडणवीस म्हणाले, “तो नियम उद्धव ठाकरे यांच्या सरकारने बनवला होता. टीडीआरचा नियम त्यांनीच आणला होता. उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने बनवलेल्या नियमांत कॅपिंग नव्हतं. याचा अर्थ तुम्ही होल्डिंग कराल आणि किंमती वाढवाल, परिणामी इतरांकडे कोणताही पर्याय उरणार नाही. आम्ही त्यात कॅपिंग आणलं”.घरांच्या किंमतींवर कॅपिंग (प्रायसिंगवर कॅपिंग) नसेल असा दावा देखील केला जात आहे. यावर फडणवीस म्हणाले, “घरांच्या किंमतींवर ९० टक्के कॅपिंग आहे. किंमती त्याच्यावर नेता येणार नाहीत. उद्धव ठाकरे यांच्या सरकारचा जो निर्णय होता तो आम्ही मान्य केला असता तर विकासक २०० टक्क्यांनी किंमती वाढवू शकले असते. त्यांनी प्रायसिंग होल्ड केल्या असत्या.देवेंद्र फडणवीस म्हणाले, “सर्वात महत्त्वाची गोष्ट मला इथे नमूद करायची आहे की, आम्ही कुठलीही गोष्ट अदाणींना दिलेली नाही. आम्ही डीआरपीला (धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरण) दिलंय.

### अन्यथा अदाणींचं कंत्राट काढून घेऊ

सरकार हे प्राधिकरण नियंत्रित करतं. आम्ही अदाणीला काही दिलेलं नाही. अदाणी प्रायव्हेट लिमिटेडला काही दिलेलं नाही. कुठलीही गोष्ट त्यांच्या कंपनीकडे हस्तांतरित केलेली नाही. सर्व काही डीआरपीच्या अखत्यारित आहे. डीआरपी आमचा अधिकारी नियंत्रित करतो. महाराष्ट्र सरकारमधील सचिव दर्जाचा अधिकारी हे प्राधिकरण सांभाळणार आहे. कोणतंही प्राधिकरण, मग ते डीआरपी असलं तरी त्यांना ज्या काही गोष्टी नियंत्रित करायच्या असतील, नियम बनवायचे असतील ते आधी सरकारकडे पाठवावे लागतील. सरकारच्या मंजुरीनंतरच ते लागू केले जातील.

# आधी धर्म सांगा मग तिरुपतीचं दर्शन घ्या!

## जगनमोहन रेड्डी यांनी केला तिरुपती दर्शनाचा बेतच रद्द

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू प्रसादात प्राण्यांची चरबी आढळल्याप्रकरणी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. तसंच, सत्ताधाऱ्यांकडून ते टीकेचे धनी बनले आहेत. चोहोबाजूने त्यांच्यावर टीका होत असताना जगन मोहन रेड्डी यांनी २८ सप्टेंबर रोजी तिरुपती येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरात जाण्याचे नियोजन केले होते. परंतु, सत्ताधारी पक्षाने त्यांच्याविरोधात निदर्शने केली. तर पोलिसांनीही त्यांना नोटीस बजावली. अखेर त्यांनी मंदिरात जाण्याचे नियोजन आता रद्द केले आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**

जगन मोहन रेड्डी यांनी मंदिरात जाण्यापूर्वी त्यांचा धर्म जाहीर करावा, अशी मागणी भाजपाकडून करण्यात येत होती. या मागणीला जोर आल्याने जगन मोहन रेड्डी यांनी हा दौराच रद्द केला. "आंध्र प्रदेश रेव्हेन्यू एंडोमेंट्स, नियम १६ आणि TTD जनरल रेग्युलेशन नियम १३६ नुसार गैर-हिंदूंनी दर्शनापूर्वी वैकुंटम रांग संकुलात धर्माबाबत घोषणा सादर करणे आवश्यक आहे", असं आंध्र प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दग्गुबती पुरंदेश्वरी यांनी सांगितले."आम्हाला समजले आहे की जगन मोहन रेड्डी या महिन्याच्या २८ तारखेला तिरुमलाला भेट देण्याचा विचार करत आहेत. तिरुमलामध्ये अनेक दशकांपासून धर्म जाहीर करण्याची प्रथा प्रचलित आहे. एपी रेव्हेन्यू एंडोमेंट्स १ च्या GO MS NO-311 नुसार , नियम क्रमांक १६, गैर-हिंदूंनी वैकुंठम रांग संकुलात दर्शनापूर्वी एक धर्माबाबत घोषणापत्र देणे आवश्यक आहे. भाजपाची मागणी आहे की जगन रेड्डी यांनी तिरुमला आरोहण सुरू करण्यापूर्वीच त्यांनी घोषणापत्र द्यावे." "टीटीडी (तिरुमला तिरुपती देवस्थानम) आणि मंदिराच्या आध्यात्मिक पावित्र्याला कलंक लावल्याबद्दल जगन यांनी आधी सर्व हिंदूंची माफी मागावी अशी आमची मागणी आहे. ते भगवान बालाजीचे दर्शन घेणार आहेत. त्याला कोणीही रोखू शकत नाही, परंतु जेव्हा ते तिरुपती तिरुमलामध्ये प्रवेश करतील तेव्हा त्यांनी घोषणापत्र द्यावं. हे सर्व गैर-हिंदूंनी केले पाहिजे", असं भाजपा नेते लंका दिनाकर म्हणाले.वायएसआरसीपीचे माजी आमदार आणि टीटीडी बोर्डाचे माजी अध्यक्ष भूमना करुणाकर रेड्डी यांनी प्रत्युत्तर दिले, "जगन यांनी यापूर्वी अनेकदा मंदिराला भेट दिली आहे आणि अनेक धार्मिक विधींमध्ये भाग घेतला आहे. त्यांना आता डिक्लेरेशन फॉर्म भरण्याची काय गरज आहे? त्यांची बदनामी करण्याचे हे राजकीय षडयंत्र आहे." "आंध्र प्रदेश रेव्हेन्यू एंडोमेंट्स, नियम १६ आणि TTD जनरल रेग्युलेशन नियम १३६ नुसार गैर-हिंदूंनी दर्शनापूर्वी वैकुंटम रांग संकुलात धर्माबाबत घोषणा सादर करणे आवश्यक आहे", असं आंध्र प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दग्गुबती पुरंदेश्वरी यांनी सांगितले."आम्हाला समजले आहे की जगन मोहन रेड्डी या महिन्याच्या २८ तारखेला तिरुमलाला भेट देण्याचा विचार करत आहेत. तिरुमलामध्ये अनेक दशकांपासून धर्म जाहीर करण्याची प्रथा प्रचलित आहे. एपी रेव्हेन्यू एंडोमेंट्स १ च्या GO MS NO-311 नुसार , नियम क्रमांक १६, गैर-हिंदूंनी वैकुंठम रांग संकुलात दर्शनापूर्वी एक धर्माबाबत घोषणापत्र देणे आवश्यक आहे. भाजपाची मागणी आहे की जगन रेड्डी यांनी तिरुमला आरोहण सुरू करण्यापूर्वीच त्यांनी घोषणापत्र द्यावे." "टीटीडी (तिरुमला तिरुपती देवस्थानम) आणि मंदिराच्या आध्यात्मिक पावित्र्याला कलंक ते भगवान बालाजीचे दर्शन घेणार आहेत. तिरुपती बालाजी मंदिरातील लाडू प्रसादात प्राण्यांची चरबी आढळल्याप्रकरणी आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी चौकशीच्या फेऱ्यात अडकले आहेत. तसंच, सत्ताधाऱ्यांकडून ते टीकेचे धनी बनले आहेत. चोहोबाजूने त्यांच्यावर टीका होत असताना जगन मोहन रेड्डी यांनी २८ सप्टेंबर रोजी तिरुपती येथील भगवान व्यंकटेश्वर मंदिरात जाण्याचे नियोजन केले होते.

### धर्माबाबत घोषणापत्र देणे आवश्यक

जगन मोहन रेड्डी यांनी मंदिरात जाण्यापूर्वी त्यांचा धर्म जाहीर करावा, अशी मागणी भाजपाकडून करण्यात येत होती. या मागणीला जोर आल्याने जगन मोहन रेड्डी यांनी हा दौराच रद्द केला. "आंध्र प्रदेश रेव्हेन्यू एंडोमेंट्स, नियम १६ आणि TTD जनरल रेग्युलेशन नियम १३६ नुसार गैर-हिंदूंनी दर्शनापूर्वी वैकुंटम रांग संकुलात धर्माबाबत घोषणा सादर करणे आवश्यक आहे""आम्हाला समजले आहे की जगन मोहन रेड्डी या महिन्याच्या २८ तारखेला तिरुमलाला भेट देण्याचा विचार करत आहेत. तिरुमलामध्ये अनेक दशकांपासून धर्म जाहीर करण्याची प्रथा प्रचलित आहे. एपी रेव्हेन्यू एंडोमेंट्स १ च्या GO MS NO-311 नुसार, नियम क्रमांक १६, गैर-हिंदूंनी वैकुंठम रांग संकुलात दर्शनापूर्वी एक धर्माबाबत घोषणापत्र देणे आवश्यक आहे.

---

# भाजपा आमदाराने विधानसभेत बलात्कार केला

## हनीट्रॅपसाठी दबाव टाकला', पीडितेचा धक्कादायक आरोप

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज



**कर्नाटकमधील भाजपाचे आमदार एन. मुनिरत्न नायडू यांनी वारंवार बलात्कार करून हनीट्रॅप करण्यासाठी बळजबरी केल्याचा आरोप एका महिलेने केला असल्याची बातमी पीटीआयने दिली आहे. या महिलेने तक्रार दाखल केली असून त्यात दावा केला की, आमदारांनी विविध ठिकाणी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.**

कर्नाटक विधानसभेची इमारत आणि सरकारी वाहनात अनेकवेळा बलात्कार झाला असल्याचा दावा पीडित महिलेने केला. तसेच ही घटना उघड केल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असेही पीडित महिलेने सांगितले आहे.पीडितेने दावा केला की, मुनिरत्न यांनी २०२० ते २०२३ या काळात तसेच ते मंत्री असताना ऑगस्ट २०२१ ते मे २०२३ या काळातही वारंवार बलात्कार केला. यानंतर मागच्या शनिवारी (१४ सप्टेंबर) विशेष न्यायालयाने मुनिरत्न नायडू यांना बलात्कार, लैंगिक अत्याचार आणि गुन्हेगारी कारवाई या गुन्ह्यासाठी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली.

यानंतर पोलिसांनी त्यांची रवानगी परप्पाना अग्रहारा येथील मध्यवर्ती कारागृहात केली. काग्गलीपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोडणाऱ्या एका खासगी रिसॉर्टमध्ये बलात्काराची घटना घडल्यानंतर ४० वर्षीय महिलेच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### तर मला ठार केले जाईल

तसेच आमदारांसह आणखी सहा जणांवर गुन्हा दाखल झाल्याचे पोलिसांनी सांगितले.दरम्यान आमदार मुनिरत्न यांनी त्यांच्यावर झालेले आरोप फेटाळले आहेत. सदर आरोप झाल्यानंतर काँग्रेसतर्फे विधानसभा इमारतीचे शुद्धिकरण करण्यात येणार होते. पण पोलिसांनी काँग्रेस नेते मनोहर यांना ताब्यात घेऊन हे आंदोलन होऊ दिले नाही. पीडित महिलेने असाही दावा केला आहे की, आमदारांनी त्यांना विविध खासगी रिसॉर्टमध्ये हनीट्रॅप करण्यासाठी बळजबरी केली. जर मी हे काम केले नाही, तर मला ठार केले जाईल.

# अक्षय कुमारला स्लिप डिस्कचा त्रास



खिलाडी' म्हणून प्रचलित असलेल्या सुपरस्टार अक्षय कुमारचा आगामी चित्रपट 'बडे मियाँ छोटे मियाँ' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, चित्रपटाच्या प्रमोशनसाठी अक्षय व टायगर यांची जोडी सध्या अनेक मुलाखतींमध्ये पाहायला मिळतेय. त्यानिमित्तानं अक्षयनं एका चित्रपटातील आठवण शेअर केली आहे; ज्यात एका शूटिंगदरम्यान त्याला मोठी दुखापत झाली होती. १९९६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाच्या फाईट सीक्वेन्सच्या शूटिंगदरम्यान अक्षयला स्लिप डिस्कचा त्रास झाला होता. रणवीर इलाहाबादियाच्या यूट्युब चॅनेलला दिलेल्या मुलाखतीत अक्षय कुमारनं सांगितलं की, त्याला 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपट नेहमी लक्षात राहतो आणि यामागचं कारण हे नाही की तो चित्रपट सुपरहिट ठरला होता. तर याचं कारण हे आहे की, या चित्रपटामुळे अक्षयच्या पाठीला गंभीर दुखापत झाली होती. मुलाखतीत अक्षय म्हणाला, "मला आणि माझ्या पाठीला हा चित्रपट कायमचा लक्षात राहिला आहे. मी अंडरटेकर ही भूमिका बजावणाऱ्या एका रेसलरला उचललं होतं आणि त्याचं वजन ४२५ पाउंड म्हणजेच १९२ किलो होतं. मी तेव्हा वेडा झालो होतो. मी ठरवलेलं की, याला मी उचलणार."अक्षयनं तो स्टंट केला आणि सीन शूट झाला. तीन दिवसांनंतर त्याला जाणवलं की, पाठीत कसला तरी त्रास होतोय. तेव्हा त्याला 'स्लिप डिस्क'चा त्रास झाला असल्याचं कळलं.२०२१ रोजी 'खिलाडियों का खिलाडी' चित्रपटाला २५ वर्षे पूर्ण झाली होती, तेव्हा अक्षयनं माहिती शेअर करून सांगितलं होतं की, या चित्रपटात स्टार रेसलर अंडरटेकर नसून ब्रायन लीनं त्याची भूमिका साकारली आहे.दरम्यान, अक्षय कुमारच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'बडे मियाँ छोटे मियाँ' या आगामी चित्रपटात अक्षय टायगर श्रॉफबरोबर झळकणार आहे.

# ऐश्वर्या - धनुषने केला घटस्फोटाचा अर्ज

दाक्षिणात्य अभिनेता धनुष आणि सुपरस्टार रजनीकांत यांची लेक निर्माती ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत जानेवारी २०२२ मध्ये विभक्त होणार असल्याची माहिती दिली होती. यानंतर मध्यंतरी मुलांसाठी हे जोडपं पुन्हा एकत्र आल्याच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, आता या जोडप्याने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. इंडिया टुडेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऐश्वर्या आणि धनुष यांनी अलीकडेच चेन्नईच्या कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. कलम १३ ब अंतर्गत त्यांचा हा घटस्फोटाचा अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दोघांनी परपस्पर सहमतीने हा निर्णय घेतला असून या प्रकरणी काही दिवसांत सुनावणी करण्यात येणार आहे. गेल्या दोन वर्षांपासून ते वेगवेगळे राहत होते. यावर अद्याप या दोघांनीही प्रतिक्रिया दिलेली नाही.ऐश्वर्या आणि धनुष यांना दोन मुलं आहेत. त्यामुळे घटस्फोटानंतर मुलांची कस्टडी कोणाकडे जाणार याबाबत कोर्टाच्या सुनावणीत स्पष्टता दिली जाणार आहे. दरम्यान, दाक्षिणात्य अभिनेता धनुषने २०२२ मध्ये आपला १८ वर्षांचा संसार मोडत, पत्नी ऐश्वर्या रजनीकांतपासून वेगळं होण्याची घोषणा केली होती. त्याची पत्नी प्रसिद्ध अभिनेते रजनीकांत यांची मुलगी आहे. ऐश्वर्या आणि धनुष यांचं २००४ मध्ये झालं होतं. त्यांना यात्रा आणि लिंगा अशी दोन मुलं आहेत.सध्या धनुष आणि ऐश्वर्या आपल्या करिअरवर लक्ष केंद्रीत करत आहेत. 'लाल सलाल' या चित्रपटाचं दिग्दर्शन ऐश्वर्यानं केलं होतं. तर लवकरच धनुष एका बॉलीवूड चित्रपटात झळकणार आहे.दाक्षिणात्य अभिनेता धनुष आणि सुपरस्टार रजनीकांत यांची लेक निर्माती ऐश्वर्या यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत जानेवारी २०२२ मध्ये विभक्त होणार असल्याची माहिती दिली होती. यानंतर मध्यंतरी मुलांसाठी हे जोडपं पुन्हा एकत्र आल्याच्या चर्चा सुरू होत्या. परंतु, आता या जोडप्याने वेगळं होण्याचा निर्णय घेतला आहे. इंडिया टुडेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ऐश्वर्या आणि धनुष यांनी अलीकडेच चेन्नईच्या कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज केला आहे. कलम १३ ब अंतर्गत त्यांचा हा घटस्फोटाचा अर्ज दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



दोघांनी परपस्पर सहमतीने हा निर्णय घेतला असून या प्रकरणी काही दिवसांत सुनावणी करण्यात येणार आहे.

# माझ्या आयुष्यात एकच दिशा

टायगर श्रॉफ 'बडे मियाँ छोटे मियाँ' या त्याचा आगामी चित्रपटाच्या तयारीत आहे. लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. टायगर आणि अक्षयने या चित्रपटाचं प्रमोशन वेगवेगळ्या शहरांत जाऊन अनोख्या पद्धतीनं केलंय.टायगरला त्याचं वैयक्तिक आयुष्य खासगी ठेवायला आवडतं. अनेकदा टायगर आणि दिशाच्या रिलेशनबद्दल अफवा पसरल्या आहेत. परंतु, या विषयावर टायगरनं नेहमीच बोलायचं टाळलं आहे. एका मुलाखतीत त्यानं दिशाचा उल्लेख केला आहे.नुकत्याच 'टाइम्स नाऊ'ला दिलेल्या मुलाखतीत जेव्हा टायगरला विचारण्यात आलं की, तू सिंगल आहेस का? तुझं आयुष्य कोणत्या दिशेला जातंय? त्यावर टायगरनं मजेशीर उत्तर दिलं. अभिनेता म्हणाला, "माझ्या आयुष्यात एकच दिशा आहे. हो आणि ते आहे माझं काम."दिशाबद्दलचा शब्दांचा हा खेळ 'बडे मियाँ छोटे मियाँ'च्या ट्रेलर लॉंचपासून सुरू झाला. जेव्हा अक्षय कुमारला विचारण्यात आलं होतं की, तो टायगरला काय सल्ला देऊ इच्छितो? तेव्हा अक्षय म्हणाला होता, "मी टायगरला एवढंच सांगेन की एकाच दिशेवर लक्ष केंद्रित कर." अक्षयच्या या वक्तव्याने सर्वत्र हशा पिकवला.टायगर श्रॉफ आणि 'दिशा पाटनी यांनी 'बेफिकरा', 'बाघी-२' अशा चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे. तेव्हापासून ते एकमेकांना डेट करीत असल्याच्या अफवा सुरू झाल्या. २०२३ मध्ये त्यांचं ब्रेकअप झालाय अशा चर्चांनाही उधाण आलं होतं. परंतु, या दोन्ही गोष्टींवर टायगर किंवा दिशानं अद्याप कोणताही खुलासा केलेला नाही.

# मी माझ्या बायकोला घाबरतो

बॉलीवूडचा बादशाह किंग खान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरुख खानची लव्हस्टोरी एखाद्या फिल्मी गोष्टीसारखीच आहे. गौरी आणि शाहरुख बॉलीवूडमधलं लोकप्रिय कपल आहे. दोघांना आदर्श कपल मानलं जातं.शाहरुख आणि त्याची पत्नी गौरी तरुण वयात भेटले आणि एकमेकांच्या प्रेमात पडले. जेव्हा शाहरुख गौरीच्या प्रेमात पडला तेव्हा तो १८ वर्षांचा होता. दोघंही दिल्लीमध्ये एका पार्टीत भेटले होते आणि त्यावेळेस ते पाच मिनिटांसाठी एकमेकांशी बोलले आणि नंतर शाहरुखला गौरीचा नंबर मिळाला. काही काळ एकमेकांना डेट केल्यानंतर दोघांनी १९९१ रोजी लग्न केलं. आधी गौरीच्या आई-बाबांना त्यांचं लग्न मान्य नव्हतं, कारण शाहरुख मुस्लीम होता. पण, शेवटी प्रेम जिंकलं आणि दोघंही आयुष्यभरासाठी एकमेकांचे साथीदार झाले.बॉलीवूडचा बादशाह किंग खान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाहरुख खानची लव्हस्टोरी एखाद्या फिल्मी गोष्टीसारखीच आहे.

# मी बोल्ड सीन करायला अगदीच तयार!



झी मराठी वाहिनीवरील 'माझिया प्रियाला प्रीत कळेना' या मालिकेतून अभिनेत्री मृणाल दुसानिसने मराठी मनोरंजनसृष्टीत पदार्पण केलं. या मालिकेतील शमिका आणि अभिजीतची जोडी प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आणि मालिकेला खूप प्रेम मिळालं. नंतर 'तू तिथे मी', 'हे मन बावरे' अशा अनेक मालिकांमध्ये ती झळकली. मृणालने त्यानंतर लग्न केलं आणि तिच्या पतीसह ती अमेरिकेला राहायला गेली. चार वर्ष अमेरिकेत राहिल्यानंतर मृणाल आता भारतात परतलीयं. एवढ्या मोठ्या ब्रेकनंतर मृणालला मालिकांमध्ये, चित्रपटांमध्ये, व्यावसायिक नाटकांमध्ये काम करायचंय; अशी इच्छा तिने व्यक्त केली आहे. कलाकारांनी आधी केलेल्या भूमिकांप्रमाणेच ते असतात, अशी छाप लोकांच्या मनावर पडलेली असते. पण, कलाकार अष्टपैलू असतात आणि ते कोणतीही भूमिका अगदी सहजरित्या करू शकतात. अगदी सोज्वळ, साध्या भूमिकेत आजवर दाखवली गेलेली मृणाल बोल्ड सीनपण करू शकते हे लोकांना पटतंच नाही. यावर नुकतीच ती एका मुलाखतीत बोलली आहे. नुकत्याच लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीत मृणाल म्हणाली, "मला ना लोकं ओळखतंच नाहीत. तुम्ही एखादं पात्र करता ना, तर त्यांना असं वाटतं की ती व्यक्ती तशीच आहे. म्हणजे मी बोल्ड सीन करायला अगदीच तयार आहे असं नाही.

# बांगलादेशी चाहत्याला मारहाण?

## पहिल्या कसोटीतही सिराजला केली होती शिवीगाळ

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारत बांगलादेश यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामान्याच्या पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे मध्येच थांबविण्यात आला. तत्पूर्वी लंच ब्रेक होण्यापूर्वी कानपूर स्टेडियममध्ये मोठी घटना घडली. बांगलादेशचा सुपर फॅन असलेल्या टायगर रॉबी याने त्याला मारहाण झाल्याचा आरोप केला आहे. वाघाचा पोशाख परिधान करून टायगर रॉबी बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष मैदानावर जात असतो. कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर सी ब्लॉक बाल्कनीत बसलेल्या रॉबीला मारहाण का झाली? याची माहिती आता पोलिसांनी दिली आहे.**



भारत वि. बांगलादेश दुसऱ्या कसोटी सामान्याचे वार्तांकन करण्यासाठी बांगलादेशहून आलेल्या पत्रकारांनीही टायगर रॉबीच्या आरोपांवर साशंकता व्यक्त केली होती. स्वतःकडे लक्ष वेधून घेण्यासाठी रॉबी सनसनाटीपणा करत असल्याचे पत्रकारांनी सांगितले. एका पत्रकाराने नाव न उघड करण्याच्या अटीवर एनडीटीव्ही स्पोर्ट्सशी बोलताना सांगितले की, रॉबी अनेकदा अशाचप्रकारचे वर्तन करताना आढळला आहे. रॉबी वैद्यकीय व्हिसावर भारतात आला असून तो सध्या वैद्यकीय उपचार घेत आहे.बांगलादेशी पत्रकारांनी पुढे सांगितले की, चेन्नईमध्ये पहिल्या कसोटीदरम्यान रॉबीने भारतीय क्रिकेटपटूंबद्दल आणि विशेषतः मोहम्मद सिराजला अश्लील शिवीगाळ केली होती. पण तिथे कुणाला त्याची भाषा (बंगाली) समजली नाही. त्यामुळे तिथे त्याला कुणी काही बोलले नाही. पण इथे कानपूरमध्ये काहींना त्याची भाषा समजली. कानपूर कसोटीच्या आदल्या दिवशी रॉबी स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला होता. त्याला निर्जलीकरण आणि अतिसाराचा त्रास होत असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रकृती ठीक नसल्यामुळे आणि मैदानात उकाड्यात बसल्यामुळे रॉबीची प्रकृती आणखी खालावली, असेही पोलिसांनी सांगितले.स्थानिक पोलिसांनी एक व्हिडीओही प्रसारित केला आहे. ज्यामध्ये रॉबी पोटावर हात ठेवून अचानक खाली बसल्याचे दिसत आहे. त्याला उभे राहणेही अवघड झाले होते. पोलिसांनी येऊन त्याला उभे राहण्यास मदत केली. पोलीस आता या प्रकरणाची चौकशी करत असून जर रॉबीने काही आगळीक केली असेल तर त्याला पुन्हा बांगलादेशला धाडण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे. बीसीसीआयनेही रॉबीचे आरोप फेटाळून लावले आहेत. सनसनाटी आरोप करण्याची त्याची जुनी सवय असल्याचे सांगण्यात आले आहे. बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी आयएनएस वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, चेन्नई मधील पहिल्या कसोटी दरम्यान रॉबीने अशाचप्रकारचे आरोप केले होते. रॉबीला तमिळ भाषा समजत नाही, तरीही त्याने असे आरोप केले होते.भारत वि. बांगलादेश दुसऱ्या कसोटी सामान्याचे वार्तांकन करण्यासाठी बांगलादेशहून आलेल्या पत्रकारांनीही टायगर रॉबीच्या आरोपांवर साशंकता व्यक्त केली होती. स्वतःकडे लक्ष वेधून घेण्यासाठी रॉबी सनसनाटीपणा करत असल्याचे पत्रकारांनी सांगितले. एका पत्रकाराने नाव न उघड करण्याच्या अटीवर एनडीटीव्ही स्पोर्ट्सशी बोलताना सांगितले की, रॉबी अनेकदा अशाचप्रकारचे वर्तन करताना आढळला आहे. रॉबी वैद्यकीय व्हिसावर भारतात आला असून तो सध्या वैद्यकीय उपचार घेत आहे.बांगलादेशी पत्रकारांनी पुढे सांगितले की, चेन्नईमध्ये पहिल्या कसोटीदरम्यान रॉबीने भारतीय क्रिकेटपटूंबद्दल आणि विशेषतः मोहम्मद सिराजला अश्लील शिवीगाळ केली होती. पण तिथे कुणाला त्याची भाषा (बंगाली) समजली नाही. त्यामुळे तिथे त्याला कुणी काही बोलले नाही. पण इथे कानपूरमध्ये काहींना त्याची भाषा समजली. कानपूर कसोटीच्या आदल्या दिवशी रॉबी स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला होता. त्याला निर्जलीकरण आणि अतिसाराचा त्रास होत असल्याचे पोलिसांनी सांगितले. प्रकृती ठीक नसल्यामुळे आणि मैदानात उकाड्यात बसल्यामुळे रॉबीची प्रकृती आणखी खालावली, असेही पोलिसांनी सांगितले.स्थानिक पोलिसांनी एक व्हिडीओही प्रसारित केला आहे. ज्यामध्ये रॉबी पोटावर हात ठेवून अचानक खाली बसल्याचे दिसत आहे. तत्पूर्वी लंच ब्रेक होण्यापूर्वी कानपूर स्टेडियममध्ये मोठी घटना घडली. बांगलादेशचा सुपर फॅन असलेल्या टायगर रॉबी याने त्याला मारहाण झाल्याचा आरोप केला आहे.

### सिराजबद्दल आक्षेपार्ह विधान

वाघाचा पोशाख परिधान करून टायगर रॉबी बांगलादेशला पाठिंबा देण्यासाठी विविध ठिकाणी प्रत्यक्ष मैदानावर जात असतो. कानपूरच्या ग्रीन पार्क स्टेडियमवर सी ब्लॉक बाल्कनीत बसलेल्या रॉबीला मारहाण का झाली? याची माहिती आता पोलिसांनी दिली आहे.भारत वि. बांगलादेश दुसऱ्या कसोटी सामान्याचे वार्तांकन करण्यासाठी बांगलादेशहून आलेल्या पत्रकारांनीही टायगर रॉबीच्या आरोपांवर साशंकता व्यक्त केली होती. एका पत्रकाराने नाव न उघड करण्याच्या अटीवर एनडीटीव्ही स्पोर्ट्सशी बोलताना सांगितले की, रॉबी अनेकदा अशाचप्रकारचे वर्तन करताना आढळला आहे.

# अश्विनच्या नावे ऐतिहासिक कामगिरी विक्रम

## अनिल कुंबळेंचा मोठा विक्रम मोडत ठरला नंबर वन

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि बांगलादेश यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पावसाने आणलेल्या व्यत्ययामुळे दुसऱ्या दिवसाचा खेळ लंच ब्रेकनंतर रद्द करण्यात आला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि पहिल्या सत्रातच भारताने ३ विकेट मिळवल्या, ज्यात आकाशदीपने २ तर आर अश्विनने एक विकेट घेतली. ही पहिली विकेट घेताच रविचंद्रन अश्विनने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.**





टीम इंडियाचा स्टार खेळाडू आर अश्विनने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. अश्विनने या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार नजमुल हुसेन शांतोला बाद करताच तो आशिया खंडात सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज ठरला. या विशेष यादीत त्याने भारताचा माजी दिग्गज खेळाडू अनिल कुंबळेला मागे टाकले आहे. या यादीत अनिल कुंबळे ४१९ विकेट्स घेऊन पहिल्या क्रमांकावर होते, मात्र आता अश्विनच्या नावावर आशियामध्ये ४२० विकेट्स आहेत.आशिया खंडात सर्वाधिक विकेट घेणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत आर अश्विनने भलेही अव्वल स्थान पटकावले असले तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर तो दुसऱ्या स्थानी आहे. आशिया खंडात सर्वाधिक विकेट मुथय्या मुरलीधरनच्या नावावर आहेत. मुथय्या मुरलीधरनने आशियामध्ये ६१२ विकेट घेतल्या आहेत. मात्र, या यादीत अश्विन दुसऱ्या स्थानावर आहे. मुथय्या मुरलीधरनला मागे टाकण्यासाठी त्याला १९३ विकेट्सची गरज आहे. जे खूप कठीण काम असणार आहे.

### मॅकग्रा यांना या यादीत मागे टाकले

आर अश्विनने नजमुल शांतोला झेलबाद केल्याचे अपील प्रथम संघाने केले होते. या विकेटसह अश्विन कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेळेस फलंदाजाला पायचीत करत विकेट घेणारा ५वा गोलंदाज ठरला. त्याने महान ऑस्ट्रेलियन गोलंदाज ग्लेन मॅकग्रा यांना या यादीत मागे टाकले आहे. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक फलंदाजांना पायचीत करत विकेट घेण्याचा विक्रम अनिल कुंबळेच्या नावावर आहे.